जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ५३८ दिनांक - १३/०७/२०२३**

## अंलकार पोलीस ठाणे, पुणे शहर

## घरफोडी करणारे सराईत आरोपी यांचेकडून जप्त करण्यात आलेला ७९,८४,४८०/- रुपये किं.चा मुद्देमाल मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे हस्ते फिर्यादी यांना पुनः प्रदान

दि.२७/११/२०२२ रोजी दाखल गुन्ह्यातील फिर्यादी यांचे घरातील रक्कम ९८,१५,०००/- रुपये किंचे डायमंड व सोन्या-चांदीचे दागिने घरफोडी करून चोरी केलेबाबत **अलंकार पोलीस स्टेशन गु.र.नं.१३६/ २०२२,भादवि कलम ४५४,४५७,३८०** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्याच्या घटनास्थळाचे तांत्रिक विश्लेषणाव्दारे तपास चालु केला असता,अलंकार पो.स्टे. तपास पथकातील पोलीस अंमलदार,धीरज पवार,सागर केकाण व नितीन राऊत यांना एक पुरूष व एक महिला संशईतरित्या घटनास्थळाच्या आजूबाजूला फिरताना आढळून आले.त्याआधारे आणखीन तपासणी केली असता,एका दुचाकीवरून एक पुरूष व एक महिला त्या ठिकाणी आली असल्याचे दिसून आले. त्यावरून तपास पथकाचे पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी संशईत इसम **राजु दुर्योधन काळमेघ,वय ४५ वर्षे,रा.एन.बी.पर्ल सोसायटी,क्रांतीनगर,वडगाव-बुद्रुक,पुणे (अटक)** यास ताब्यात घेवुन,त्याच्याकडे दाखल गुन्ह्याचे अनुषंगाने तपास केला असता,त्याने सदरचा गुन्हा हा त्याची महिला साथीदार सोनिया पाटील असे दोघांनी मिळून केला असल्याचे कबुल केल्याने,राजु काळमेघ यास दिनांक ०६/११/२०२२ रोजी दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

तांत्रिक विश्लेषणाचे आधारे महिला आरोपीचा शोध घेणेकामी वेग-वेगळ्या ठिकाणी तपास पथके रवाना करण्यात आली.त्यामध्ये पोलीस निरीक्षक,गुन्हे,श्रीमती.संगिता पाटील यांचे पथकाने आरोपी महिला सोनिया पाटील ही दाखल गुन्ह्यात चोरी केलेला मुद्देमाल घेवून पळून जाण्याचे तयारीत असताना,वाकड या ठिकाणावरून **सोनिया श्रीराम पाटील,वय-३२ वर्षे,रा.सदर (अटक)** हिस मुद्देमालासह दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

दाखल गुन्ह्यात चोरीस गेलेला मुद्देमाल अटक आरोपी इसम व महिला यांचेकडून हस्तगत करण्यात आल्यानंतर तो जप्ती पंचनाम्याने जप्त करून,मुद्देमाल कक्षात जमा करण्यात आला होता.सदरचा मुद्देमाल दाखल गुन्ह्यातील फिर्यादी यांना परत करणेबाबत मा.न्यायालयाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर आज दिनांक १३/०७/२०२३ रोजी मा.पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर येथे **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री. रितेश कुमार यांचे हस्ते ७९,८४,४८०/- किंचा मुद्देमाल फिर्यादी यांना परत करण्यात आला आहे.**

सदरवेळी मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-३,पुणे,श्री.सुहेल शर्मा,अलंकार पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.राजेश तटकरे व पोलीस निरीक्षक,गुन्हे,श्रीमती.संगिता पाटील हे उपस्थित होते.तसेच सदर कार्यक्रमामध्ये पोलीस निरीक्षक,गुन्हे,श्रीमती संगिता पाटील यांचा मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे हस्ते पुष्पगुच्छ देवुन सत्कार करण्यात आला आहे.


अलंकार पोलीस स्टेशन,पुणे शहर

